क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१०/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३५५ दि. ०५ / ०९ / २०११

**विषय : महावितरण कंपनीतील वेतनगट-४ मधील पात्र कर्मचारीवर्गाला द्यावयाच्या वुलनकोट, स्वेटर व पावसाळी साहित्य इ. च्या दरामध्ये वाढ करणेबाबत.**

.....

संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ मधील तरतुदीनुसार महावितरण कंपनीतील वेतनगट-४ मधील पात्र कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या वुलनकोट, स्वेटर व पावसाळी साहित्य इ. च्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून महावितरण कंपनीतील वेतनगट ४ मधील पात्र कर्मचाऱ्यांना वुलनकोट, स्वेटर व पावसाळी साहित्य इ. खरेदीच्या रकमेच्या प्रतिपुर्तीच्या दरामध्ये खालील तक्त्यातील रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्यास मंजूरी प्रदान केली आहे.

| अ.क्र. | विवरण | संवर्ग | कालावधी | सुधारित प्रतिपुर्तीचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | पुरूषांची छत्री | दप्तरी व शिपाई | २ वर्षातून एकदा<br>एप्रिल २०१० ते मार्च २०१२ | रु.१५०/- |
| २ | स्त्रीयांची छत्री | दप्तरी व शिपाई | २ वर्षातून एकदा<br>एप्रिल २०१० ते मार्च २०१२ | रु.१५०/- |
| ३ | गमबूट | पहारेकरी | ४ वर्षातून एकदा<br>एप्रिल २००८ ते मार्च २०१२ | रु.३००/- |
| ४ | वुलनकोट | दप्तरी, शिपाई व पहारेकरी | ४ वर्षातून एकदा<br>एप्रिल २००८ ते मार्च २०१२ | रु.१८३०/-<br>(कापड व शिलाईसहित) |
| ५ | स्वेटर | महिला शिपाई व दप्तरी | ४ वर्षातून एकदा<br>एप्रिल (२००८ ते मार्च २०१२) | रु.१०००/- |

३. संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून वेतनगट-४ मधील पात्र कर्मचाऱ्यांनी वरील साहित्य खरेदी करून खरेदीच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत देयके प्रतिपुर्तीसाठी संबंधीत अधिकाऱ्यांकडे सादर करावीत.

४. सदर परिपत्रक दि. ०५/०९/२०११ पासून अंमलात येईल.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

(विजय भि. बागुल) ५/९/२०११
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

D:\O&M\Adm Cir - F.N.10-Uniform.doc